शपथेवर उलटतपास सामनेवालेकरीता वकील श्री. ए. व्ही. कदम

८) हे म्हणणे खरे नाही की, माझी पहिल्यांदा सामनेवाले कंपनीत ज्युनिअर ऑफिसर म्हणून नेमणूक केली होती. मला आता निशाणी सी-१४, अ.क्र. १, पान क्र. १ ते ३ वर दाखल नेमणूक आदेश दाखविला. हे म्हणणे खरे आहे की, तो माझा नेमणूक आदेश आहे व त्या आदेशाप्रमाणे माझी नेमणूक ज्युनिअर ऑफिसर म्हणून झाली होती. त्यास **निशाणी सी-१५** देण्यात आले. हे म्हणणे खरे आहे की, मी माझ्या १५ वर्षांच्या सेवाकाळामध्ये कंपनीला असे पत्र दिले नाही की, माझी नेमणूक ज्युनिअर ऑफिसर म्हणून झाली नाही आणि निशाणी सी-१५ चे पत्र खोटे आहे. हे म्हणणे खरे आहे की, ई.आर.पी. सिस्टीम होती. हे म्हणणे खरे आहे की, ई.आर.पी. सिस्टीम वापरण्यासाठी प्रत्येकाला कोड दिला होता. हे म्हणणे खरे नाही की, माझा कोड Datta होता. (तक्रारदार स्वतःहून सांगतात की, माझा कोड D0112 होता.) हे म्हणणे खरे आहे की, ती सिस्टीम वापरण्यासाठी प्रत्येकाला काही अधिकार दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, सदरची सिस्टीम वापरण्याचे अधिकार सर्वांना नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, फक्त सुपरवायझर आणि वरील पदे यांना सदरची सिस्टीम वापरण्याचा अधिकार होता, कामगारांना नाही. (तक्रारदार स्वतःहून सांगतात की, सदरची सिस्टीम आम्ही पे स्लीप बघण्यासाठी वापरत होतो.)

९) हे म्हणणे खरे आहे की, मी जॉन डिअर लाईनवर काम करत होतो. हे म्हणणे खरे आहे की, सदर लाईनवर जे मटेरिअलची प्रक्रिया होत

होती त्याच्या पुढील प्रक्रियेसाठी ते एका व्हेंडर - Paramount Engineers यांना पाठविले जायचे. हे म्हणणे खरे आहे की, सदरचे मटेरिअल परत पाठवायचे आणि परत घ्यायचे ही फार मोठी महत्वाची बाब होती. हे म्हणणे खरे आहे की, ते मटेरिअल बाहेर पाठविताना डिलीव्हरी चलने बनवून बाहेर पाठवायचे. आता मला निशाणी सी-१४, पान क्र. १३, १४, १६, १७, १९, २०, २१, २२, ३२, ३४, ३५, ३६, ३७, ३८ व ३९ वर दाखल दस्ताऐवज दाखविले. हे म्हणणे खरे आहे की, सदरचे डिलीव्हरी चलने ई.आर.पी. सिस्टीममधून तयार करण्यात आलेली आहेत. हे म्हणणे खरे नाही की, सदरचे चलने मी तयार केलेली आहेत. हे म्हणणे खरे नाही की, त्यावर Initiator म्हणून Datta असे नमूद केले आहे व तो माझा कोड आहे. त्यास **निशाणी सी-१६ ते सी-३०** अनुक्रमे देण्यात आले. हे म्हणणे खरे आहे की, ते मटेरिअल फक्त सुपरवायझर पाठवित होते. हे म्हणणे खरे नाही की, सदरचे मटेरिअल माझा ई.आर.पी कोड Datta वरून व माझा अधिपत्याखाली जात होते त्यावरून असे सिध्द होते की, मी सुपरवायझर होतो.

१०) आमच्या कंपनी तीन शिफ्ट होत्या. हे म्हणणे खरे नाही की, मी जनरल शिफ्टमध्ये काम करत होतो. हे म्हणणे खरे नाही की, मी सुपरवायझर होतो म्हणून मला जनरल शिफ्ट दिली होती आणि अगदी तातडीचे काम असेल तर मला दुसरी आणि तिसरी शिफ्ट दिली जायची. हे मला माहीत नाही की, जॉन डिअर लाईनसाठी मटेरिअल स्टोअरमधून

मागविले जायचे त्यासाठी requisition slips ने मागविले जायचे. आता मला निशाणी सी-१४, पान क्र. १५, १८, २३, २४, ३३, ४०, ४१, ४२, ४३ व ४४ वर दाखल दस्ताऐवज दाखविले. हे मला माहीत नाही की, अशा requisition slip ने मटेरिअल मागविले जायचे. त्यास **निशाणी सी-३१ ते सी-३८** अनुक्रमे (for identification) देण्यात आले. हे म्हणणे खरे नाही की, सदरच्या requisition slips मी माझ्या ई.आर.पी. कोड खाली तयार करून मटेरिअल मागविले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मटेरिअल मागविण्याचा अधिकार फक्त सुपरवायझर यांचा होता म्हणून मी खोटे सांगत आहे की, मी सुपरवायझर नव्हतो.

११) हे म्हणणे खरे आहे की, एखाद्या कामगाराला कामाच्या वेळेस बाहेर जायचे असेल तर त्याला गेट पास घ्यावा लागतो. हे म्हणणे खरे आहे की, त्या गेटपासावर अधिकारी यांची सही असेल तर सिक्युरीटी त्याला बाहेर सोडायचे. मला निशाणी सी-१४, पान क्र. ४ ते ९ वर दाखल दस्ताऐवज दाखविले. हे म्हणणे खरे नाही की, मला दाखविण्यात आलेल्या गेट पासवर ऑथेरिटी सिग्नेचर म्हणून माझ्या सह्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी कामगार आहे हे दाखविण्यासाठी मी असे खोटे बोलत आहे की, ती सही माझी नाही. सदर गेटपास **निशाणी सी-३९ एकत्रितरित्या** देण्यात आले. मला निशाणी सी-१४, पान क्र. १० व ११ वर दाखल दस्ताऐवज दाखविले. हे म्हणणे खरे नाही की, सदर रजा अर्जांवर माझ्या सह्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, पान क्र. १० व

११ वर माझ्या हाताखाली काम करणा-या कर्मचा-यांचे सुट्टीचे अर्ज आहेत व ते शिफारस करण्यासाठी त्यावर मी सह्या केल्या आहेत. त्यास **निशाणी सी-४० एकत्रितरित्या** देण्यात आले.

१२) आता मला निशाणी यु-५ वर दाखल केलेला वकालतनामा दाखविला. हे म्हणणे खरे आहे की, त्यावर माझी सही आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी दाखल केलेल्या निशाणी यु-१ वर तक्रारीवर माझी सही आहे. कोविडच्या काळात मी एक महिना सुट्टीवर होतो, बाकीच्या वेळी मी कामावर होतो. हे म्हणणे खरे आहे की, कोविडच्या काळात कंपनीने बरीच बंधने आखली होती. आता मला निशाणी सी-१४ पान क्र. २५ ते ३० दाखविले. हे म्हणणे खरे नाही की, त्यावर माझ्या सह्या आहेत. त्यास निशाणी **निशाणी सी-४१ एकत्रितरित्या** (for identification) देण्यात आले. हे म्हणणे खरे नाही की, कोविडच्या काळात सर्व कर्मचा-यांना कंपनीने आखलेल्या बंधनांचे पालन करतात की नाही हे बघून मी कंपनीला सदरच्या चेकलिस्ट सादर करीत होतो.

१३) हे म्हणणे खरे आहे की, शॉप फ्लोअरवर प्लान्ट मॅनेजर व एच.आर. मॅनेजर राउंड घ्यायचे. हे म्हणणे खरे नाही की, ते मशिनच्या समोर उभे राहून फोटो काढू शकतात.

१४) **प्रश्न -** जर प्लान्ट मॅनेजर व एच.आर. मॅनेजर मशिनच्या समोर उभे राहून फोटो काढू शकत नाहीत तर तुम्ही निशाणी यु-२३

वरील फोटो कसे काढले ?

**उत्तर -** प्रत्येक ऑपरेटर तिथे काम करत आहे त्यासाठी फोटो काढत होतो.

१५) हे म्हणणे खरे नाही की, मी जे फोटोबाबत सांगत आहे ते मी नंतर विचार करून सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी यु-२३ सोबत दाखल फोटो कधी काढले अशी त्यावर तारीख नमूद नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर फोटोमध्ये सर्व कामगार लाईनमध्ये उभे आहेत त्यात मी उभा आहे हे स्पष्टपणे दिसत नाही. हे म्हणणे खरे नाही की, केवळ या केससाठी मी तयार केलेले हे फोटो आहेत. आता मला आर्टीकल सी वर दाखल कागदपत्र दाखविले. हे म्हणणे खरे आहे की, मा. औद्योगिक न्यायालयात दाखल केलेल्या तक्रारीमध्ये माझे नाव नमूद नाही. त्यास **निशाणी यु-२६** देण्यात आले. आता मला निशाणी यु-२४ एकत्रितरित्या पान क्र. ३५ दाखविण्यात आले. हे म्हणणे खरे नाही की, त्यावर माझी सही आहे. (तक्रारदार स्वतःहून सांगतात की, प्रोसेस ऑनर म्हणून मी माझे नाव लिहिले आहे व ऑपरेटरचे नाव हरी आहे.) त्यास **निशाणी यु–२७** देण्यात आले. आता मला निशाणी यु–२४ एकत्रितरित्या पान क्र. ३६ ते ३८ दाखविण्यात आले. हे म्हणणे खरे नाही की, त्यावर दत्ता म्हणून माझी सही आहे. त्यास **निशाणी यु-२८** (for identification) देण्यात आले. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या हाताखाली काम करणा-या ऑपरेटरने ते काम केले आहे ते बरोबर आहे म्हणून मी सुपरवायझर म्हणून सही केली व ते कंपनीला सादर केले होते.

१६) आता मला निशाणी यु–२४ एकत्रितरित्या पान क्र. २९ ते ३४ दाखविण्यात आले. ते पेट्रोल इन्स्पेक्शन रिपोर्ट आहेत. हे म्हणणे खरे आहे की, ते Q.A. विभागात जनरेट करतात. हे म्हणणे खरे आहे की, त्याची प्रत बाहेर कोणाला दिली जात नाही, ते फक्त कंपनीचे इंटरनल रेकॉर्ड आहे. त्याच्या प्रती माझ्याकडे होत्या. हे म्हणणे खरे आहे की, त्याचे फॉरमेट करून Q.A. विभाग ठेवलेले असतात. आता मला निशाणी यु–२४ एकत्रितरित्या पान क्र. २९ ते ३४ दाखविण्यात आले. हे म्हणणे खरे नाही की, सदरची पाने एकाच पेनाने / शाईने भरलेली आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी कंपनीमधून ब्लॅक फॉरमेट घेतले व ते भरून सदर केसमध्ये दाखल केले आहेत.

१७) हे म्हणणे खरे नाही की, मी जॉन डिअर लाईनचे पूर्ण काम करायचो व माझ्या हाताखाली १० ते १५ लोक काम करायचे. हे म्हणणे खरे नाही की, त्या संपूर्ण लाईनवर मी कामाचे वाटप, हाताखालच्या कामगारांवर देखरेख आणि त्यांच्याकडून टारगेट पूर्ण करून घ्यायचो. हे म्हणणे खरे नाही की, मशिनमध्ये जर बिघाड झाला तर सुपरवायझरची मदत घेवून ते दुरूस्त करायचे.

१८) आता मला निशाणी सी-१४ पान क्र. ३१ वर दाखल दस्ताऐवज दाखविले. हे म्हणणे खरे आहे की, पान क्र. ३१ वर माझी सही आहे. त्यास **<u>निशाणी सी-४२</u>** देण्यात आले. त्या प्रमाणपत्रावर दि. ०१/०३/२००८ पासून ज्युनिअर ऑफिसर म्हणून काम करत होतो असे

त्यात नमूद आहे. आता मला निशाणी सी-१४ पान क्र. ४ ते ११ वर दाखल दस्ताऐवज दाखविले. हे म्हणणे खरे नाही की, त्यावर माझे नाव लिहिलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी कंपनीमध्ये सुपरवायझर म्हणून काम करत होतो म्हणून मी स्वतःला वाचविण्यासाठी मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.
फेरतपास नाही.
श्रवणोत्तर स्वीकृत.

माझेसमोर,

सही/–
(श्रीमती. टी. ए. सावंत)
न्यायाधीश,
प्रथम कामगार न्यायालय, पुणे.

पुणे

दिनांक ३०/०१/२०२५